# पुणे महानगरपालिका

## कनिष्ठ अभियंता भरती २०१६

## शुध्दीपत्रक व मुदतवाढ

पुणे महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील गट 'क' मधील कनिष्ठ अभियंता (स्थापत्य/विद्युत/यांत्रिकी) हि पदे सरळसेवा प्रवेशाने भरण्यासाठी जाहिरात क्र. 1/303, दि.08/08/2016 अन्वये पदांची शैक्षणिक अर्हता व इतर बाबींची पूर्तता करणाऱ्या पात्र उमेदवारांकडून www.punecorporation.org व https://maharecruitment.mahaonline.gov.in या संकेतस्थळावर ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविण्यात आले होते.

तथापि तांत्रिक कारणास्तव वर नमुद जाहिरातीस खाली नमुद तपशीलाप्रमाणे मुदत वाढ देण्यात येत असुन पात्र उमेदवारांकडून www.punecorporation.org व https://maharecruitment.mahaonline.gov.in या संकेतस्थळावर ऑनलाईन पध्दतीने खालील मुदतीत अर्ज मागविण्यात येत आहेत.

### ऑनलाईन अर्ज भरण्यासंबंधी वेळापत्रक

| | | |
|---|---|---|
| १ | ऑनलाईन पध्दतीने अर्ज सुरु होण्याचा दिनांक | 02/09/2016 |
| २. | ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरण्याचा अंतिम दिनांक | 08/09/2016 रोजी 23.59पर्यंत |
| ३. | संगणकीय चलनाव्दारे स्टेट बँक ऑफ इंडिया यांच्या शाखेमध्ये फी स्वीकृतीचा कालावधी | 02/09/2016 ते 09/09/2016 |
| ४. | परीक्षेसाठी ऑनलाईन प्रवेशपत्र उपलब्ध होण्याचा दिनांक | 26/09/2016 पासून |
| ५. | ऑनलाईन परीक्षेचा दिनांक | 08/10/2016 (संभाव्य) |

जाहिरात क्र. 1/303, दि. 08/08/2016 मधील अट क्र. 3 वयोमर्यादा मध्ये खालील शासन निर्णयातील तरतुदीनुसार बदल करणेत येत आहे.

१. कनिष्ठ अभियंता गट 'क' मधील पदांसाठी सर्व प्रवर्गातील उमेदवारांचे वय अर्ज स्विकृतीच्या अंतिम दिनांकास किमान 18 वर्षे पूर्ण असणे आवश्यक राहील. तसेच,
२. महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग शासन शुध्दीपत्रक क्र.मासैक-१०१०/ प्र.क्र.२७९/१०/१६-अ, दि.२०/०८/२०१० अन्वये माजी सैनिकांसाठी उमेदवाराच्या सशस्त्र दलात झालेल्या सेवे इतका कालावधी अधिक ३ वर्षे इतकी राहील. तसेच,
३. महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र. निवक-१०१०/ प्र.क्र.०८/२०१० /१६-अ, दि.०६/१०/२०१० अन्वये स्वातंत्र्य सैनिकाचे पाल्यांसाठीचे वय ४५ वर्षे इतके राहिल. तसेच,
४. महाराष्ट्र शासन राजपत्र क्र. पीएमसी-3014/प्र.क्र.2/नवि-22, दि.04/09/2014 अन्वये पुणे महानगरपालिकेत व शासन मान्य पदावर नियुक्त असलेल्या कर्मचाऱ्यासाठी कमाल वयोमर्यादा लागू नसेल. तसेच,
५. करार पध्दतीने काम करणाऱ्या उमेदवारांसाठी महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र. सीबीई-१८९३/प्र.क्र.३८/९३/तेरा दि.१५/२/९५ प्रमाणे राहील.
६. अट क्र. 3.4 मधील स्वातंत्र्य सैनिक या ऐवजी माजी सैनिक असे वाचावे.

उपरोक्त क्र. 1 ते 6 प्रमाणे बदल करणेत येत असुन जाहिरात क्र. 1/303, दि. 08/08/2016, मध्ये नमुद केलेल्या उपरोक्त सुधारणा व्यतिरिक्त अन्य सर्व सुचना जशाच्या तशा लागू राहतील. ज्या उमेदवारांनी जाहिरात क्र. 1/303, दि. 08/08/2016 च्या अनुषंगाने परिक्षा शुल्कासह अर्ज भरले आहेत अशा उमेदवारांनी पुनःश्च अर्ज करण्याची आवश्यकता नाही. याची संबंधीतांनी नोंद घ्यावी.

ऑनलाईन पध्दतीने अर्ज करण्याबाबतच्या व इतर सर्वसाधारण सूचना महापालिकेच्या www.punecorporation.org व https://maharecruitment.mahaonline.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत, त्याचे उमेदवारांनी काळजीपूर्वक अवलोकन करुन अर्ज करावेत.

सही/-
**(कुणाल कुमार)**
**महापालिका आयुक्त**
**पुणे महानगरपालिका**

**जाहिरात क्रमांक : 1/357/2016**
दिनांक : 31/08/2016